**ठळक बातम्या**

- सरकार आणि जनतेतली दरी कमी करण्याचं काम नागरी सेवेतल्या अधिकाऱ्यांनी करावं, असं प्रधानमंत्र्यांचं आवाहन
- इसरोच्या स्पेडेक्स या अंतराळ डॉकिंग अभियानाअंतर्गत आज उपग्रहांची दुसरी जोडणी यशस्वी
- अमेरिकेचे उपराष्ट्राध्यक्ष जे. डी. व्हान्स यांचं चार दिवसांच्या भारतदौऱ्यावर आगमन
- महाराष्ट्राचे मुख्य माहिती आयुक्त म्हणून राहुल पांडे यांचा शपथविधी

**आणि**

- झारखंडमध्ये आज सकाळी सुरक्षा दलांबरोबर झालेल्या चकमकीत ८ नक्षली ठार

**<><><><><>**

सरकार आणि जनतेतली दरी कमी करण्याचं काम नागरी सेवेतल्या अधिकाऱ्यांना करायचं आहे असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. १७व्या नागरी सेवा दिनानिमित्त दिल्लीत विज्ञान भवन इथं आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. केवळ नशिबाच्या जोरावर, कष्ट न करता यश मिळत नसतं,  बदलत्या काळाचा वेग लक्षात घेऊन तंत्रज्ञानाच्या  आधारे विकासाच्या संधी निर्माण केल्या पाहिजेत असं ते म्हणाले. गेल्या १० वर्षात देशाने विविध विकास कार्यक्रमांच्या माध्यमातून केलेल्या प्रगतीची उदाहरणं मोदी यांनी दिली.

**होल्ड - बाइट - प्रधानमंत्री...**

पीडित आणि वंचितांप्रति सहानुभूतीचा दृष्टिकोन ठेवून सर्वांना सामावून घेणारा विकास घडवावा असा सल्ला त्यांनी नागरी सेवा अधिकाऱ्यांना दिला.

प्रशासनातल्या उत्कृष्ट कामगिरीसाठीचे प्रधानमंत्री उत्कृष्ट प्रशासन पुरस्कार यावेळी प्रधानमंत्र्यांच्या हस्ते १६ अधिकाऱ्यांना देण्यात आले. होलिस्टिक डेवलपमेंट ऑफ डिस्ट्रिक्ट, आकांक्षित खंड विकास कार्यक्रम आणि नवोन्मेष अशा तीन विभागात मिळून १ हजार ५८८ प्रवेशिकांमधून हे १६ पुरस्कार देण्यात आले. स्मृतीचिन्ह, मानपत्र, आणि २० लाख रुपयांचं रोख पारितोषिक असं पुरस्कारांचं स्वरूप आहे.

विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री जितेंद्र सिंग, प्रधानमंत्र्याचे प्रधान सचिव शक्तिकांत दास आणि प्रशासकीय सेवेतले वरिष्ठ अधिकारी या कार्यक्रमाला उपस्थित होते.

**<><><><><>**

१७ वा नागरी सेवा दिन आज साजरा होत आहे. १९४७ मध्ये तत्कालीन गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी आजच्याच दिवशी प्रशिक्षणार्थी प्रशासकीय अधिकाऱ्यांना उद्देशून भाषण केलं होतं. त्यानिमित्त हा दिवस नागरी सेवा दिन म्हणून साजरा केला जातो.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी यानिमित्त नागरी सेवेतल्या अधिकारी कर्मचाऱ्यांना शुभेच्छा दिल्या आहेत. सार्वजनिक सेवा, धोरणनिर्मिती आणि त्याच्या अंमलबजावणीमध्ये नागरी सेवकांची भूमिका नागरिकांच्या कल्याणात आणि देशाच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावत आहे. राष्ट्राची महत्त्वाकांक्षी उद्दिष्टे साध्य करण्यात आणि प्रभावी प्रशासनात नवीन मापदंड स्थापित

करण्यात नागरी सेवक महत्त्वाची भूमिका बजावतात, असं राष्ट्रपतींनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

इसरो अर्थात भारतीय अंतराळ संशोधन संस्थेच्या स्पेडेक्स या अंतराळ डॉकिंग अभियानाअंतर्गत आज उपग्रहांची दुसरी जोडणी यशस्वीरीत्या करण्यात आली. गेल्या ३० डिसेम्बरला पी एस एल वी - सी सिक्सटी मोहिमेनंतर स्पेडेक्स अंतर्गत उपग्रहांची जोडणी १६ जानेवारीला पहिल्यांदा करण्यात आली होती तर १३ मार्च रोजी ते यशस्वीपणे वेगळे करण्यात आले होते. यापुढचे प्रयोग येत्या दोन आठवड्यांत केले जाणार असल्याची माहिती विज्ञान आणि तंत्रज्ञानमंत्री डॉक्टर जितेंद्र सिंह यांनी दिली.

**<><><><><>**

सरकारी योजनांच्या लाभार्थ्यांना त्यांच्या बँक खात्यात थेट हस्तांतरण प्रक्रियेद्वारे लाभ देण्याच्या योजनेमुळे देशाचे आतापर्यंत ३ लाख ४८ हजार कोटी रुपयांची बचत झाली असल्याचं केंद्रीय माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी म्हटलं आहे. या संदर्भात प्रसिद्ध केलेल्या धोरणात्मक अहवालाचा संदर्भ देत त्यांनी समाज माध्यमावर संदेशद्वारे ही माहिती दिली आहे. या डीबीटी अर्थात थेट हस्तांतरण प्रक्रियेद्वारे पैसे देण्याच्या योजनेमुळे प्रशासनात पारदर्शकता वाढली असून २०१३ पूर्वीपेक्षा विविध योजनांचे लाभार्थी १६ पटीने वाढले असल्याच ही वैष्णव यांनी सांगितलं.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्यापासून दोन दिवसांच्या सौदी अरेबियाच्या दौऱ्यावर जाणार असून उद्या ते जेद्दाह इथं पोहोचतील. गेल्या ४० वर्षांमध्ये

जेद्दाह या सौदी अरेबियातल्या आर्थिक महत्त्वाच्या शहराला भारताचे प्रधानमंत्री प्रथमच भेट देणार आहेत.

**<><><><><>**

अमेरिकेचे उपराष्ट्राध्यक्ष जे. डी. व्हान्स आजपासून चार दिवसांच्या भारतभेटीवर सहकुटुंब आले आहेत. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज त्यांचं विमानतळावर स्वागत केलं. व्हान्स आज संध्याकाळी नवी दिल्लीत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याबरोबर द्विपक्षीय चर्चा करतील. यावेळी दोन्ही नेत्यांदरम्यान परस्पर संबंध आणखी दृढ करण्याच्या उपायांबाबत चर्चा होईल. तसंच जागतिक घडामोडींबाबतही दोन्ही नेते चर्चा करतील. गेल्या फेब्रुवारीमधे प्रधानमंत्री मोदी अमेरिकेच्या दौऱ्यावर असताना उभय देशांच्या संयुक्त निवेदनात नमूद केलेल्या उपाययोजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्याची संधी, व्हान्स यांच्या या भेटीमुळे मिळेल.

व्हान्स यांनी दिल्लीतल्या अक्षरधाम मंदिराला सहकुटुंब भेट दिली. या दौऱ्यात व्हान्स कुटुंब जयपूर आणि आग्र्यालाही भेट देणार आहे.

**<><><><><>**

रशिया आणि यूक्रेनमधे या आठवड्यात युद्ध संपवण्यासाठी शांतता करार होईल, अशी आशा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी व्यक्त केली आहे. या दोन्ही देशांनी शांतता करार केल्यास अमेरिकेबरोबर व्यवसाय करून आर्थिक फायदा करून घेऊ शकतील, असं ट्रम्प आपल्या समाज माध्यमावरच्या संदेशात म्हणाले आहेत.

**<><><><><>**

महाराष्ट्र राज्याच्या मुख्य माहिती आयुक्तपदी राहुल पांडे यांची नियुक्ती झाली आहे. राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी त्यांना पदाची शपथ दिली. त्यांच्यासोबत रवींद्र ठाकरे, प्रकाश इंदलकर, गजानन निमदेव यांना राज्य माहिती आयुक्तपदाची शपथ देण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थतीत मुंबईत राजभवन इथं हा शपथविधी झाला.

या सोहळ्याला मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव तथा माहिती आणि जनसंपर्क महासंचालक ब्रिजेश सिंह, विधान परिषद सदस्य परिणय फुके, पत्रकार तसंच विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

**<><><><><>**

पोषण आहार पंधरवड्यानिमित्त यवतमाळ जिल्ह्यात विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत. प्रकल्प अधिकारी विशाल जाधव यांनी सांगितलं..

**होल्ड - बाइट - विशाल जाधव…**

**<><><><><>**

झारखंडमध्ये आज सकाळी सुरक्षा दलांबरोबर झालेल्या चकमकीत ८ नक्षलवादी मारले गेले. बोकारो इथल्या लुगू टेकडी पायथा परिसरात ही चकमक झाली. यात एक कोटी रुपयांचं बक्षीस असलेल्या एका माओवाद्याचा समावेश आहे. सुरक्षा दलांनी घटनास्थळावरून अनेक शस्त्रास्त्रं देखील हस्तगत केली आहेत. आतापर्यंत नक्षलवाद्यांचे आठ मृतदेह सापडले असून चकमकीदरम्यान पळून गेलेल्या नक्षलवाद्यांना घेरण्यात आल्याची माहिती झारखंडचे पोलीस महासंचालक अनुराग गुप्ता यांनी दिली. परिसरात अद्याप शोध मोहीम सुरु आहे.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज कोलकाता नाईट रायडर्सविरुद्ध गुजरात टायटन्स हा सामना कोलकात्यात होणार आहे.

काल एका सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने पंजाब किंग्स इलेव्हन संघाचा ७ गडी आणि ७ चेंडू राखून पराभव केला. पंजाब किंग्सचं १५७ धावांचं आव्हान बंगळुरू संघाने देवदत्त पड्डीकल आणि विराट कोहली यांच्या अर्धशतकाच्या जोरावर सहज पार केलं.

मुंबईच्या वानखेडे मैदानावर झालेल्या सामन्यात मुंबई इंडियन्सने चेन्नई सुपर किंग्ज संघाचा ९ गडी राखून पराभव केला. चेन्नईने १७६ धावांचं लक्ष्य दिलं होतं; मुंबईनं रोहित शर्मा आणि सुर्यकुमार यादव यांच्या नाबाद तडाखेबंद अर्धशतकांच्या जोरावर २६ चेंडू राखून हे लक्ष्य पूर्ण केलं.

**<><><><><>**

आयएएसएफ विश्व करंडक स्पर्धेत 10 मीटर एअर रायफल प्रकारातील मिश्र दुहेरीत भारताच्या रुद्रांक्ष पाटील आणि आर्या बोस यांना रौप्य पदक मिळालं. पेरुमधील लिमा इथं सुरू असलेल्या या स्पर्धेतलं भारताचं हे तिसरं रौप्य पदक आहे. दोन सुवर्ण पदकांसह भारत पदकतालिकेत तिसऱ्या स्थानावर आहे.

***//<><><><><>//***